न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी-चिंचवड
» गुरुवार, दि. 10 एप्रिल 2025 | पान- 1

# महापालिकेला महाराष्ट्र आरोग्य सन्मान 2025 पुरस्कार

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाचा मुंबई येथे झाला सन्मान

**पिंपरी | प्रतिनिधी**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त सोमवारी (७ एप्रिल) मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृह येथे झालेल्या "महाराष्ट्र आरोग्य सन्मान २०२५" या राज्यस्तरीय कार्यक्रमात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाचा दोन पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबीटकर यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.



महानगरपालिकेच्या वतीने आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, डॉ. राजेंद्र फिरके, डॉ. बाळासाहेब होडगर, डॉ. ऋतुजा लोखंडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत सुपेकर, डॉ. संध्या भोईर, यशस्विता बाणखेले (पी.एच.एन) यांनी हा सन्मान स्वीकारला.

"महाराष्ट्र आरोग्य सन्मान २०२५" या कार्यक्रमात सार्वजनिक आरोग्य विभागातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांचा, महानगरपालिकांचा, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांत उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थांचा व रुग्णालयांचा स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाला दोन पारितोषिके मिळाली आहेत.

'राज्यातील सर्वाधिक प्रसूती करणारे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र' या श्रेणीत कै. ह.भ.प. प्रभाकर मल्हारराव कुटे स्मृती रुग्णालय आकुर्डी या रुग्णालयाला पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार देण्यात आला आहे. तसेच आरोग्य वैद्यकीय अधिकारी (MOH RANKING) या श्रेणीत दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला मिळाला आहे. या पुरस्कारासाठी वर्षभरात रुग्णालयांद्वारे दिल्या जाणाऱ्या सर्व सेवा, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम यांचा सविस्तर विचार करून आणि मूल्यमापन करून आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांची क्रमवारी निश्चित करण्यात आली होती.

या कार्यक्रमात राज्यभरातील जिल्हा रुग्णालये, महानगरपालिका यांसह एकूण ५१ बक्षिसे प्रदान करण्यात आली. महाराष्ट्रातील २७ महानगरपालिकांपैकी फक्त ५ महानगरपालिकांना एकूण ६ पारितोषिके मिळाली असून त्यापैकी २ पारितोषिके पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला मिळाली आहेत.

> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला राज्यस्तरावर दोन पुरस्कार मिळाले असून हा सन्मान पिंपरी चिंचवड शहरातील सर्व नागरिकांचा आहे. महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून सातत्याने करण्यात येणाऱ्या उत्कृष्ट कामाचा हा सन्मान आहे. आगामी काळातही पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना उत्तमोत्तम आरोग्य सेवा देण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील राहील.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

---

# त्रिवेणीनगरमधील चौकांमध्ये दोन्ही बाजूंना 'हाईट बॅरीगेट्स'

## आमदार महेश लांडगे यांच्या सूचनेची अंमलबजावणी : वाहनचालकांना दिलासा

**पिंपरी | प्रतिनिधी**

निगडीतील त्रिवेणीनगर, दुर्गानगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील जड वाहतूक, वारंवार होणारी वाहतूक कोंडी, तसेच या भागातील शाळांची मोठी संख्या त्यामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षा लक्षात घेऊन या महत्त्वाच्या चौकांमध्ये दोन्ही बाजूंना 'हाईट बॅरीगेट्स' बसविण्यात येणार आहेत.

याबाबत महापालिका स्थापत्य विभाग, निगडी वाहतूक विभागाला भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी सूचना केली होती. त्यानुसार सदर कार्यवाही करण्यात आली.

निगडी येथील प्रभाग क्रमांक १३ मध्ये असणाऱ्या दुर्गानगर चौकातून यमुनानगर मध्ये जाणाऱ्या रस्त्याला जड वाहनास बंदी आहे. तरी सुद्धा अनेकदा या रस्त्यावर भरधावपणे जड वाहने वाहतूक करतात. यापूर्वीच या भागातील जड वाहतूक बंद करण्यात यावी, अशी मागणी केली होती. वाहतूक विभागाने त्याप्रमाणे सकारात्मक प्रतिसाद देखील दिलेला होता मात्र या भागातून जडवाहनांना संपूर्णपणे अटकाव होऊ शकत नसल्याचे



दिसून आले आहे. या भागामध्ये शाळांची संख्या सर्वाधिक आहे. नागरिक, पालकवर्ग, शाळेतील विद्यार्थी वर्ग, शाळेतील शिक्षिक वर्ग व कामगार वर्ग यांची रहदारी मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे अपघाताची शक्यता असते.

अपघाताच्या काही घटना यापूर्वी देखील झालेल्या होत्या. अपघातावर नियंत्रण आणण्यासाठी या सर्व्हिस रस्त्यावरील जड वाहतुकीवर नियंत्रण आणण्यासाठी उंचीचे बॅरिगेट्स लावण्याची गरज होती. त्याप्रमाणे महापालिका स्थापत्य विभाग आणि निगडी वाहतूक विभागाला सूचना करून त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात आली आहे. त्रिवेणीनगर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे दोन्ही बाजूला उंचीचे बेरीगेट्स बसविण्यात येत आहे, अशी माहिती माजी नगरसेवक प्रा. उत्तम केंदळे यांनी दिली.

> वाढत्या महानगरांसमोर वाहतूक नियंत्रण, वाहतूक कोंडी या मोठ्या समस्या आणि आव्हान आहे. या समस्या सोडवण्यासाठी नागरिकांची मागणी, प्रभागाच्या लोकप्रतिनिधींची सूचना वेळोवेळी लक्षात घेतली जाते. त्याप्रमाणे निगडी लगतच्या त्रिवेणीनगर, दुर्गानगर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी उंचीचे बॅरियर बसविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. यामुळे नागरिक, विद्यार्थी तसेच ज्येष्ठांना मोठा दिलासा मिळणार आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.**

# पुणे विमानतळ धावपट्टी विस्ताराला गती

## धावपट्टीच्या विस्तारासाठी हवाई दलाला पर्यायी जागा : प्रस्तावावर एकमत

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरील धावपट्टीच्या विस्तारापूर्वी राज्य सरकारला हवाई दलाला पर्यायी जागा द्यावी लागणार आहे. हवाई दल आणि विमानतळ प्राधिकरण यांच्यात मंगळवारी या प्रस्तावावर एकमत झाले. त्यानुसार विमानतळ प्राधिकरणाकडून संबंधित प्रस्ताव तयार करून राज्य सरकार आणि हवाई दलाच्या मुख्यालयाला पाठविण्याबाबत हालचाली सुरू झाल्या आहेत.




हवाई वाहतुकीच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय शहरे पुण्याशी जोडली जावी, मोठ्या आकाराच्या विमानांची वाहतूक व्हावी या उद्देशाने पुणे विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्ताराला केंद्रीय पातळीवरील यंत्रणांकडून परवानगी मिळाली आहे. मात्र, आवश्यक भूसंपादन आणि विस्ताराबाबत संरक्षण विभाग, हवाई विभाग या विभागांच्या तरतुदींबाबत प्रक्रिया पार पाडण्यासंदर्भात, तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली.

विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, विमानतळाचे संचालक संतोष ढोके, हवाई दलाचे वरिष्ठ अधिकारी, महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

पुणे विमानतळ हवाई दलाचे आहे. त्यामुळे धावपट्टीच्या विस्तारासाठी प्रामुख्याने संबंधित विभागाची जागा विमानतळ प्राधिकरणाला ताब्यात घ्यावी लागणार आहे. ही जागा ताब्यात आल्यानंतर प्राधिकरणाला अपेक्षित ठिकाणी व्यवस्थापनाबाबत तरतुदी करणे शक्य होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर हवाई दलाकडून जागेच्या मोबदल्यात पर्यायी जागा असा प्रस्ताव मोहोळ यांच्या बैठकीत मान्य झाला. त्यामुळे धावपट्टी विस्तारासाठी किती जागा अपेक्षित आहे, हवाई दलाची जागा, खासगी जागा किती संपादित करावी लागणार आहे, त्यासाठी सर्वेक्षण करण्यात येणार आहे. तसेच, हवाई दलाला मोबदल्यात पर्यायी जागा देण्याबाबत मुख्यालयाच्या संमतीसाठी मागणी प्रस्ताव तयार करण्यात येणार आहे.

संबंधित प्रस्ताव पाठविल्यानंतर सहमती प्राप्त होताच पर्यायी जागेबाबत राज्य सरकारकडून मान्यता घेतली जाईल. त्यानंतर विमानतळाच्या धावपट्टीसाठी भूसंपादन प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

### हवाई दलाच्या जागेबाबत सर्वेक्षण

» गेल्या वर्षी पुणे विमानतळ धावपट्टी विस्तारीकरणासाठी आवश्यक असणारा 'ऑब्स्टिकल लिमिटेशन सरफेस' (ओएलएस) सर्व्हेचा अहवाल सकारात्मक आला आहे. त्यामुळे विस्तारीकरण झाल्यावर कुठलेच अडथळे येणार नसून उड्डाण करताना सुरक्षिततेबाबतचे मापदंडही सुस्थितीत आहेत. त्यामुळे हवाई दलाच्या जागेबाबत सर्वेक्षण करून राज्य सरकारकडे जागेची मागणी करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले होते.

> पुणे विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरण गरजेचे आहे. ही प्रक्रिया वेगाने होण्यासाठी संबंधित विभागांना युद्धपातळीवर काम करण्याचे निर्देश दिले आहेत. विस्तारासाठी राज्य सरकारकडून भूसंपादन प्रक्रिया वेगाने करण्यासाठी विमानतळ प्राधिकरणाला हवाई दलाची जागा ताब्यात घेण्यासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
>
> **- मुरलीधर मोहोळ, केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री.**

# येरवडा ते कात्रज 'ट्वीन टनेल'ला गती

## पीएमआरडीएने सल्लागार नियुक्तीसाठी जागतिक निविदा प्रक्रिया सुरू केली

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील दळणवळण गतिमान करण्यासाठी येरवडा ते कात्रज बोगदा मार्ग (ट्वीन टनेल) करण्याच्या दृष्टीने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यासाठी सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्याचे निश्चित केले आहे. त्यासाठी जागतिक पातळीवर निविदा प्रक्रिया मागविण्यात आली आहे.

'शहरातील वाहतूक सुधारावी, यासाठी येरवडा ते कात्रज हा भुयारी मार्ग तयार करावा. हा भुयारी मार्ग 'ट्वीन टनेल' पद्धतीचा असावा. यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करावा आणि त्याबाबतचा प्रस्ताव तातडीने सादर करण्यात यावा,' असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पीएमआरडीएचा अर्थसंकल्प मंजूर करताना फेब्रुवारी महिन्यात दिले होते.

शहरात पूर्व ते पश्चिम जोडणारे अनेक रस्ते आहेत. मात्र, उत्तर ते दक्षिण जोडणारे मार्ग कमी आहेत. त्यामुळे 'पीएमआरडीए'ने येरवडा ते कात्रज भुयारी मार्ग करण्याचे निश्चित केले होते. त्यानुसार पीएमआरडीए प्रशासनाने त्याबाबतची प्रक्रिया सुरू केली आहे.

येरवडा आणि कात्रज या दरम्यानचे अंतर १४.५ किलोमीटर एवढे आहे. या मार्गावर दिवसभर मोठ्या प्रमाणावर वाहतूक असते. या नियोजित प्रकल्पामुळे प्रवासाचा वेळ कमी होईल आणि मुख्य रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी होईल, असा दावा पीएमआरडीए प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

### प्रकल्पाचे तांत्रिक आणि आर्थिक मूल्यांकन

» व्यवहार्यता अभ्यासामध्ये या प्रकल्पाचे तांत्रिक आणि आर्थिक मूल्यांकन करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रकल्पाचा तपशीलवार व्यवहार्यता अहवाल (डीएफआर) तयार करण्यात येणार आहे. तीन महिन्यांत ही प्रक्रिया पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्यानंतर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सार्वजिक खासगी भागीदारी (पीपीपी) सह अन्य प्रारूप पर्यायांचा शोध घेतला जाणार आहे. त्यामध्ये 'बांधा-वापरा आणि हस्तांतरण करा' (बीओटी) आणि हायब्रिड ॲन्युनिटी मॉडेल (एचएएम) सारख्या पर्यायांचाही विचार करण्यात येण्याची शक्यता आहे.

> येरवडा ते कात्रज बोगदा करण्याच्या दृष्टीने जागतिक पातळीवर सल्लागार नियुक्तीचे प्रस्ताव निविदेच्या माध्यमातून मागविण्यात आले आहेत. तीन महिन्यांत व्यवहार्यता तपासणी होणे अपेक्षित आहे.
>
> **- प्रभाकर वसईकर, अधीक्षक अभियंता, पीएमआरडीए.**

# इंद्रायणीच्या प्रदूषणाला जबाबदार कोण?

## कोण करत आहे नदी प्रदूषित? स्थानिक नागरिकांसह पर्यावरणप्रेमींनी केली गूगल मॅपद्वारे पोलखोल

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंद्रायणी नदी प्रदूषित होण्यास आसपासच्या कंपन्या कारणीभूत आहेत अशी ओरड नेहमीच केली जात होती. चिखली, कुदळवाडीतील अनधिकृत बांधकामे, रासायनिक कंपन्यातील रसायनमिश्रित पाणी नदीत मिसळत असल्याने इंद्रायणी प्रदूषित होत असल्याच्या प्रतिक्रिया महापालिका पर्यावरण आणि आरोग्य विभागाकडून वारंवार व्यक्त केल्या जात होत्या. त्याअनुषंगाने या अनधिकृत बांधावर बुलडोझर फिरवण्यात आला. आता हा भाग स्वच्छ झाल्यामुळे इंद्रायणी नदी स्वच्छ होईल असे वाटत असतानाच प्रदूषण घटल्याचे दिसत नाही. त्यामागील कारण शोधण्याचा प्रयत्न आता पर्यावरणप्रेमींनी केला आहे.

इंद्रायणी नदीच्या प्रदूषणामागील कारण काय आहे याचा शोध पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांनी घेतला आहे. त्याअनुषंगाने नदीकाठचा भाग फिरून त्याचे गूगल मॅपिंग करून नदी प्रदूषित होण्यात चिखली येथील तीन एमएलडीच्या एसटीपी प्रकल्पातील प्रक्रिया न केलेले सांडपाणी नाल्याद्वारे नदीत मिसळत असल्याचे स्पष्ट झाले आहे. नदी प्रदूषित होण्यास हे पाणी कारणीभूत ठरत असल्याचे सिद्ध केले. यानंतर त्यांनी याबाबत नद्यांचे मारेकरी कोण ? कोण करत आहे नदीप्रदूषण असे प्रश्न विचारात महापालिका प्रशासनाला धारेवर धरले आहे.

गूगल मॅपद्वारे इंद्रायणी नदी प्रदूषित होण्याचे कारण शोधण्याची संकल्पना पर्यावरणप्रेमी प्रशांत राऊळ यांनी पिंपरी-चिंचवडकरांपुढे मांडली. त्यांनी केलेल्या पाहणीत चिखली येथे तीन एमएलडी क्षमतेच्या एसटीपी प्रकल्पातील प्रक्रिया न केलेले सांडपाणी नाल्यातून नदीत मिसळत असल्याचे निदर्शनास आले आहे. हा प्रकल्प नाल्यावरच उभा केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. मोई फाटा येथील नाल्यातून प्रक्रिया न केलेले सांडपाणी मिसळल्यामुळे इंद्रायणी नदीतील पाणी पूर्णपणे काळवंडलेले दिसत आहे.

चोवीस बाय सात हे प्रक्रिया न केलेले सांडपाणी नदीत मिसळते. देहूपासून मोई फाट्यापर्यंत येणारे नदीचे पाणी बऱ्यापैकी स्वच्छ दिसत आहे. त्यानंतर मोई फाट्याजवळ नाल्यातून प्रदूषित, प्रक्रिया न केलेले सांडपाणी इंद्रायणी नदीत मिसळत असल्याचे राऊळ यांनी केलेल्या पाहणीतून दिसून येत आहे. मोई फाट्यापासून पुढे चिंबळी, आळंदी येथे प्रदूषित पाणी नदीत मिसळल्यामुळे अनेक ठिकाणी नदीमध्ये पाणी फेसाळलेले दिसत आहे. त्यामुळे इतरवेळी कंपन्यातील रसायनमिश्रित पाण्यामुळे नदी प्रदूषित होत असल्याच्या प्रतिक्रिया देणारे अधिकारी आता यावर काय उत्तर देणार असा प्रश्न पर्यावरणप्रेमींनी उपस्थित केला आहे.




### का फेसाळतेय पाणी?

» इंद्रायणी नदीत साबणासारखा फेस वाहणे हे नित्याचेच झाले आहे. पिंपरी-चिंचवडमधील विनापरवाना चालणाऱ्या शेकडो कंपन्या या प्रदूषणाला कारणीभूत आहेत. ज्या कंपन्या रसायनयुक्त पाणी या नदी पात्रात सोडतात, त्यांच्यावर कठोर कारवाईची मागणी पुन्हा जोर धरत आहे. आषाढी वारी, कार्तिकी एकादशी अशा प्रसंगी लाखो वारकरी आळंदीनगरीत दाखल होतात. तेव्हा ते याच इंद्रायणी नदीत ते पवित्र स्नान करतात अन् तीर्थ म्हणून हेच रसायनयुक्त पाणी पितात. पण आता वारकरी अन स्थानिकांना या पाण्यामुळे आजार जडत आहेत. गेल्या सात वर्षांपासून अनेकदा अशी परिस्थिती उद्भवलेली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तशा तक्रारी ही करण्यात आल्या आहेत.

> महापालिका पर्यावरण विभाग इतरवेळी परिसरात असणाऱ्या कंपन्यातील रसायनमिश्रित पाणी इंद्रायणीत मिसळत असल्याने नदी प्रदूषित होत असल्याचा आरोप अथवा दावा करत असतो. आता कुदळवाडी आणि चिखलीतील अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त केली आहेत. त्यामुळे तेथील रसायनमिश्रित प्रदूषित पाणी मिसळण्याचा प्रश्नच येत नाही. मात्र महापालिकेच्या एसटीपी प्रकल्पातील प्रक्रिया न केलेले सांडपाणी सरळ नदीत मिसळत असल्याचे आमच्या पाहणीत सिद्ध झाले आहे. त्यामुळे नदी प्रदूषित करणारे नद्यांचे खरे मारेकरी कोण हे कोणा ज्योतिषाला विचारण्याची गरज नाही.
>
> **- शांत राऊळ, पर्यावरणप्रेमी**

# पे अँण्ड पार्क, ठेकेदाराला 75 टक्के योग्यच, महापालिका प्रशासनाने केला खुलासा

## शहरातील काही भागांत पे अँण्ड पार्क योजना सुरु केली आहेत. जमा झालेल्या शुल्कातील 75 टक्के हिस्सा ठेकेदाराला आणि उर्वरित हिस्सा महापालिकेचा असे धोरण ठरले आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेने शहरातील काही भागांत पे अँण्ड पार्क योजना सुरू केली आहेत. जमा झालेल्या शुल्कातील ७५ टक्के हिस्सा ठेकेदाराला आणि उर्वरित हिस्सा महापालिकेचा असे धोरण ठरले आहे. त्यात बदल करता येणार नाही, असा खुलासा महापालिकेच्या शहरी दळणवळण विभागाने केला आहे. तसेच पे अँड पार्कच्या माध्यमातून ठेकेदाराचा खिसा भरण्याचा हेतू नसल्याचा दावा त्या विभागाने केला आहे. याबाबत शहरातील नागरिकांनी लेखी तक्रार विभागाकडे केली होती.

महापालिकेने शहरात सुरू केलेल्या पे अँण्ड पार्क योजनेत वाहनांसाठीचे शुल्क निम्मे करावे. त्याद्वारे मिळणारे उत्पन्न महापालिका व ठेकेदारांनी निम्मे निम्मे घ्यावे, अशी लेखी सूचना सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी केली होती. त्यांच्या पत्रास उत्तर देताना वरील खुलासा करण्यात आला आहे. शहरी दळणवळण विभागाचे सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड यांनी पत्रात खुलासा केला आहे की, निगडी येथील मधुकर पवळे उड्डाण पूल, भक्ती-शक्ती उड्डाण पूल, चापेकर चौक, स्पॉट १८, सनशाईन व्हिलाज, नाशिक फाटा उड्डाण पूल, अंकुशराव लांडगे नाट्यगृह, मदर टेरेसा उड्डाण पूल आदी ठिकाणी प्रायोगिक तत्वावर पे अँण्ड पार्क सुरू करण्यात येणार आहे.

त्यापैकी नाशिक फाटा व मदर टेरेसा उड्डाण पूल येथे पे अँण्ड पार्क सुरू करण्यात आले आहे.

महापालिकेच्या २६ फेब्रुवारी २०२० च्या ठरावानुसार ही योजना राबविण्यात येत आहे. ठेकेदाराला कर्मचारी नियुक्ती व तांत्रिक प्रणालीसाठी खर्च करावा लागणार आहे. कर्मचाऱ्यांचे वेतन ठेकेदाराला करावे लागते. देखभाल खर्च, तिकीट यंत्रणा, डिजिटल पेमेंट व सॉफ्टवेअर विकसित करून त्याची देखभाल करण्याचा खर्च ठेकेदाराचा आहे. पार्किंगच्या वाहनांची अनिश्चित संख्या, वाहनांचे नुकसान किंवा चोरी ही जबाबदारी ठेकेदाराची आहे.

त्यामुळे या योजनेतून प्राप्त झालेल्या उत्पन्नापैकी ७५ टक्के ठेकेदाराला आणि २५ टक्के महापालिकेस असणार आहे. त्यामुळे दर्जेदार सेवा मिळेल. ही पार्किंग उत्पन्नाची विभागणी सुरूवातीच्या सहा महिन्यांसाठी आहे. त्यात बदल करण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत.



> शहरात पे अँण्ड पार्क योजनेत सुधारणा करण्यात येत आहे. शहरातील वाहतुकीमध्ये सुसूत्रता आणणे. अतिक्रमण हटवणे. पार्किंगसाठी सुविधा निर्माण केल्या जातील. वाहनचालकांना मासिक व साप्ताहिक पास उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.
>
> **- बापूसाहेब गायकवाड, सहशहर अभियंता**

# पेठची नवी नळयोजना विजेअभावी बंदच

## महावितरण कंपनी प्रादेशिक नळ योजनेसाठी वीज जोड देण्यासाठी कोटेशन देत नसल्याने 25 कोटी रुपये खर्च करून उभारलेली योजना सुरू होऊ शकली नाही

**पुणे | प्रतिनिधी**

सातगाव पठार तालुका आंबेगाव भागातील कुरवंडी कोल्हारवाडी थुगाव भावडी कारेगाव पेठ पारगाव या गावांसाठी पेठ प्रादेशिक योजनेची सन २०२० मध्ये स्थापना झाली. जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेचे काम पूर्ण झाले आहे. नुकतेच ग्रामपंचायतीच्या जुन्या नळ योजनेचे थकीत वीज बिल भरूनही महावितरण कंपनी प्रादेशिक नळ योजनेसाठी वीज जोड देण्यासाठी कोटेशन देत नसल्याने २५ कोटी रुपये खर्च करून उभारलेली योजना सुरू होऊ शकली नाही योजनेचे काम पूर्ण होऊनही केवळ वीज कनेक्शनअभावी बंद आहे.

सातगाव पठार भागातील वरील गावांना जल जीवन योजनेअंतर्गत नळ पाणीपुरवठा करण्यासाठी माजी मंत्री दिलीप वळसे पाटील माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील तत्कालीन जिल्हा परिषद सदस्य देविदास दरेकर यांच्या प्रयत्नाने शासनाने २५ कोटी रुपये मंजूर केले. पळस्टिका येथे ११ गुंठे जागा विकत घेऊन त्या ठिकाणी विहीर खोदण्यात आली आहे. कुरवंडी येथे वीस गुंठे जागेमध्ये फिल्टर प्लांटचे काम पूर्ण झाले आहे.

ग्रामपंचायतीच्या जुन्या नळ योजनेचे थकीत वीज बिल भरूनही महावितरण कंपनी प्रादेशिक नळ योजनेसाठी वीज जोड देण्यासाठी कोटेशन देत नसल्याने २५ कोटी रुपये खर्च करून उभारलेली योजना सुरू होऊ शकली नाही योजनेचे काम पूर्ण होऊनही केवळ वीज कनेक्शनअभावी बंद आहे. कोटमदरा येथील सब स्टेशन करण्यात आले, विहिरीपासून पाण्याच्या टाकीपर्यंत पाईपलाईनचे काम देखील झाले आहे. फक्त वीज जोडणी करून पाणी योजना सुरू करणे बाकी आहे. मात्र, महावितरण सदर ग्रामपंचायतींना जुन्या नळ योजनेचे राहिलेले वीज बिल पूर्ण भरा, त्यानंतरच वीज जोडणीसाठी कोटेशन देऊ, अशी आडमूठी भूमिका घेतली. या योजनेला त्यामुळे खीळ बसली आहे. महावितरण वीज जोड न दिल्यास आंदोलन केले जाईल, असा इशारा नळ योजनेतील सदस्य रवींद्र तोतरे तसेच पेठ प्रादेशिक नळ योजनेचे उपाध्यक्ष महेश धोत्रे यांनी दिला आहे.



> जल जीवन मिशन अंतर्गत २५ कोटीच्या योजनेचे काम पूर्ण झाले आहे. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर चर्चा झाली आहे. पण थकबाकी भरा त्यानंतर वीज पुरवठा जोडला जाईल, अशा आडमुठ्या भूमिकेमुळे सातगाव पठार भागात उन्हाळ्यामध्ये पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. तरी महावितरणने सातगाव पठार भागातील नागरिकांची अडवणूक न करता त्वरित विद्युत कनेक्शन जोडून द्यावे.
>
> **- संजय पवळे, सरपंच,पेठ ग्रामपंचायत**

> काही ग्रामपंचायतींनी थकीत बिल भरले आहे. नियमित बिल राहिले आहे. सध्या उन्हाळा सुरू आहे. सातगाव पठार भागात पिण्याच्या पाण्याची नितांत गरज असून त्यामुळे ही योजना सुरू होण्यासाठी महावितरण सकारात्मक भूमिका घेऊन सहकार्य करावे.
>
> **- रामशेठ तोडकर, अध्यक्ष, पेठ प्रादेशिक पाणी योजना**

> संबंधित ग्रामपंचायतकडे थकीत वीज बिल बाकी आहे. संबंधित ग्रामपंचायतींनी विज बिल भरले असेल तर तातडीने प्रादेशिक योजनेची वीज जोडसाठी कोटेशन दिले जाईल. कोटेशन भरल्यानंतर तातडीने वीज पुरवठा जोडून कारवाई केली जाईल.
>
> **- शांताराम बांगर, कार्यकारी अभियंता, महावितरण मंचर**

> सातगाव पठार भागामध्ये पाण्याची नेहमीच टंचाई असते. जलजीवन योजनेमुळे सर्वांना पाणी मिळेल. त्यामुळे महावितरणने पिण्याच्या पाण्यासाठी वीज जोड तातडीने देऊन वीज पुरवठा करावा.
>
> **- संतोष धुमाळ, संचालक, शरद सहकारी बँक**

# टोमॅटोचा भाव गडगडल्याने शेतकरी हवालदिल


## मंचर व नारायणगाव बाजार समिती येथे 30 रुपये ते 70 रुपये 20 किलोच्या प्रतिकॅरेटचा भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट आले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

टोमॅटो पिकाचा बाजार मागील काही आठवड्यांपासून कमी झाला आहे. बाजारातील आवक वाढल्यानंतर भाव पडले. भाव पडल्याने उत्पादन खर्चही भरून निघत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे अर्थकारण कोलमडले आहे. कमी कालावधीत अधिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या टोमॅटोचा बाजारभाव अभावीलाल चिखल झाला आहे. भाव गडगडल्याने शेतकऱ्यांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे.

मंचर व नारायणगाव बाजार समिती येथे ३० रुपये ते ७० रुपये २० किलोच्या प्रतिकॅरेटचा भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट आले आहे. त्यामुळे टोमॅटो उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांनी जगायचं कसं, असा सवाल टोमॅटो उत्पादकांमधून उपस्थित केला जात आहे.आंबेगाव तालुक्यातील मंचर,घोडेगाव, अवसरी खुर्द, अवसरी बुद्रुक, मेंगडेवाडी,पिंपळगाव, खडकी, चांडोली,भराडी,जवळे,निरगुडसर, पारगाव, काठापूर, लाखनगाव, कळंब,वडगाव काशिबेग परिसरातील अनेक शेतकरी टोमॅटो पीक घेतात.

टोमॅटोचे पीक नगदी व भांडवली असल्याने लागवडीपासून काढणीपर्यंत मोठा खर्च होतो. पण सध्या टोमॅटो पिकाला बाजारभाव नसल्याने शेतकरी हवालदिल झाले असून लाखो रुपये भांडवल घालून पोटच्या पोराप्रमाणे पिकलेली टोमॅटो शेती बाजारात कवडीमोल झाल्यामुळे शेवटी पिकाला विळा लावण्याची वेळ शेतकरी वर्गावर आली आहे. टोमॅटोचे भाव घसरल्याने आर्थिक नुकसान होत आहे.



> मंचर बाजार समिती येथे ३० रुपये ते ७० रुपये २० किलोच्या प्रतिकॅरेटचा भाव मिळत असल्याने मोठे आर्थिक नियोजन कोलमडले आहे.यात गाडी भाडेदेखील सुटत नाही. आजमितीला महिला मजुराला ३०० ते ३५० रुपये आणि पुरुषाला ४०० ते ५०० रुपये मजुरी द्यावी लागते. उत्पादन, खर्चाचा ताळमेळ बसत नाही.
>
> **- रमेश खिल्लारी, टोमॅटो उत्पादक शेतकरी भराडी.**

> कांदा, टोमॅटो, फ्लॉवर मिळणारा भाव त्या भावातून शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नाही. फायद्याचे तर सोडाच, अशीच काहीशी परिस्थिती सर्व पिकांची झाली आहे. सरकारने पीक उत्पादनासाठी हमीभाव दिला पाहिजे.
>
> **- महेश ढमढेरे,शेतकरी व संचालक भैरवनाथ पतसंस्था मंचर.**

> काही टोमॅटो उत्पादक यांनी दर नसल्याने टोमॅटो शेताच्या बांधावर टाकून दिले आहे. मशागत, रोपे, फवारणी, आधार देण्यासाठी लागणाऱ्या काठ्या व तारा, सुतळ्या आणि त्यासाठी द्यावी लागणारी मंजूरी याचा खर्च खूप मोठा आहे. अशा पिकांसाठी अनुदान देण्याचा विचार केला पाहिजे.
>
> **- निलेश थोरात,सभापती कृषी बाजार समिती मंचर.**